| CNR No.MHWR030060002024 | खटला दाखल तारीख | – | ०३.१०.२०२४ |
|---|---|---|---|
| | खटला नोंदणी तारीख | – | ०३.१०.२०२४ |
| | खटला निकाल तारीख | – | ११.०३.२०२६ |
| | कालावधी | ०१ व, ०५ म, ०८ दि | |

**भाग –' अ '**

**<u>Form No. XXXII</u>**

**(Title Page of the Judgment)**

**(Para 44 (i) of Chapter VI of Criminal Manual)**

**<u>विद्यमान मुख्यन्यायदंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात</u>**

(पीठासीन अधिकारी – श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

**<u>नियमित फौजदारी खटला क्र.६८०/२०२४</u>** **<u>अपराध क्र.१४८६/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र.१०</u>**

महाराष्ट्र शासनातर्फे पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे वर्धा शहर, ता व जि. वर्धा. --- **<u>अभियोग पक्ष</u>**

**विरुध्द**

मुकेश मुन्ना पांडे,
वय अंदाजे ३५ वर्षे, कामधंदाः मजुरी,
राह. ईतवारा बाजार, वर्धा. --- **<u>आरोपी</u>**

==========================================

सरकार पक्षातर्फे सरकारी वकील – श्री.एस.एम.दुंगे
आरोपीतर्फे वकील – श्री.ए.के.पांडे

==========================================

**<u>भारतीय शस्त्र अधिनियमाचे कलम ४ सह कलम २५ प्रमाणे दोषारोप.</u>**

## भाग –' ब '

**(Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | १४.०९.२०२४ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | १४.०९.२०२४ |
| ३ | दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०३.१०.२०२४ |
| ४ | दोषारोप निश्चिती दिनांक | ०९.०१.२०२६ |
| ५ | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०७.०२.२०२६ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ११.०३.२०२६ |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | ११.०३.२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुकेश मुन्ना पांडे | १४.०९.२०२४ | २३.१०.२०२४ | भा.श.अ. कलम ४ सह कलम २५ अन्वये | निर्दोष | निर्दोष | --- |

## भाग –' क'

**(Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)**

**LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES**

अ. <u>अभियोग पक्ष</u> –

| अनु.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा रमेश मडावी | नि.क्र.९ | घटनास्थळ/जप्ती पंच |

ब. <u>बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर</u> –

| अनु.क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

क. <u>न्यायालयीन साक्षीदार असतील तर</u> -

| अनु.क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

<u>न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी</u>

ड. <u>अभियोग पक्ष</u> -

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही | P1/PW1 |

इ. <u>बचाव पक्ष</u> -

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| --- | --- | --- |

ई. <u>भौतीक वस्तु</u> -

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| --- | --- | --- |

# न्यायनिर्णय

(दिनांक ११.०३.२०२६ रोजी पारीत)

सदरचा खटला आरोपीविरुध्द भारतीय हत्यार कायद्याचे कलम ४ सह कलम २५ अन्वये चालविण्यात आला.

**सरकार पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

२. दिनांक १४.०९.२०२४ रोजी फिर्यादी पोलीस हवालदार राजेश राठोड ब.क्र.८७९ हे पोलिस शिपाई सुरज जाधव ब.क्र.१५८६, पोलीस शिपाई संभाजी मुंडकर ब.क्र.१६४९, पोलीस शिपाई अशफाक शेख ब.क्र.१६०० यांना सोबत घेवून पोलीस स्टेशन वर्धा शहर परिसरात कोबींग ऑपरेशन राबवीत असतांना त्यांना मुखबीरकडून माहीती मिळाली की ईतवारा बाजार येथे राहणारा मुकेश पांडे हा त्याचे घरासमोर समोर सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर हातामध्ये तलवार घेवून दहशत पसरवित आहे व त्याचे दहशतीने येणारे जाणारे लोक सैरावैरा पळत आहे. त्याप्रमाणे ते व उपरोक्त पोलीस कर्मचारी यांनी श्री.विवेक खंडाळकर व श्री.कृष्णा मडावी या पंचांना खबरेप्रमाणे माहीती देवून घटनास्थळी बोलाविले. फिर्यादी व इतर पोलीस कर्मचारी खाजगी वाहनाने घटनास्थळी पोलीस चौकीसमोर वाहन उभे करुन काही अंतर पायदळ गेले असता त्यांना आकाशी रंगाचा शर्ट व पायात निळया रंगाची जिन्स पॅन्ट घातलेला ईसम सार्वजनिक रस्त्यावर हातामध्ये धारदार तलवार घेवून दहशत पसरवीत असतांना मिळून आला. त्याला पंचांना दाखवून पंच व पोलीस कर्मचारी यांचे मदतीने घेराव घालून निशस्त्र ताब्यात घेतले व पंचांसमक्ष त्याचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मुकेश मुन्ना पांडे वय वर्षे ३५, राह. ईतवारा बाजार, वर्धा, ता.जि.वर्धा असे सांगितले. त्यानंतर त्यांनी स्वतःचा परिचय देवून त्यास तलवार

बाळगण्याचे कारण विचारले असता आरोपीने उडवाउडवीचे उत्तरे दिली. फिर्यादी व इतर पोलीस कर्मचारी यांना आरोपी हा गंभीर स्वरुपाचा दखलपात्र गुन्हा केल्याची खात्री झाल्याने त्याला घेवून ते पोलीस स्टेशनला परत आले. आरोपीचे सदरचे कृत्य हे भारतीय हत्यार कायदा कलम ४ दंडनिय सह कलम २५ प्रमाणे दिसून आल्याने आरोपीविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४ दंडनिय सह कलम २५ अन्वये गुन्हा दाखल होणेकरीता त्याने पोलीस स्टेशन वर्धा येथे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादवरुन आरोपीविरुध्द गुन्हा क्र.१४८६/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ४ सह कलम २५ अन्वये पोलीस ठाणे वर्धा शहर, तालुका व जिल्हा वर्धा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आणि गुन्हयाचा तपास पोलीस शिपाई राजेश राठोड ब.क्र.८७९ यांनीच केला. तपासा दरम्यान त्यांनी दोन पंचांना सूचनापत्र देवून घटनास्थळी बोलाविले व त्यांचे समक्ष घटनास्थळ–जप्ती पंचनामा केला व आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी तलवार जप्त केली. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीस अटक केली व दोन पंचांसमक्ष अटक फॉर्म तयार केला. त्यानंतर त्याने आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. दिनांक ०९.०१.२०२६ रोजी आरोपीविरुध्द निशाणी क्र.७ नुसार भारतीय हत्यार कायद्याचे कलम ४ सह २५ अन्वये दोषारोप निश्चित केले. तसेच सदर दोषारोपामधील मजकूर आरोपीला त्याच्या भाषेमध्ये समजावून सांगितला. त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले म्हणून सरकारपक्षाची केस पुढे चालविली.

५. आरोपीविरुध्द अभियोग पक्षाच्या पुराव्यात गुन्हयाशी संबंध दाखविणारी परिस्थिती न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे आरोपीचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. दोन्ही पक्षांच्या वतीने करण्यात आलेला युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणातील वस्तुस्थिती व सादर पुरावा यावरुन खालील प्रश्न निर्णित कामी उपस्थित होतात, ज्यावरील निष्कर्ष नमूद कारणांसह पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सरकार पक्ष हे सिध्द करतात काय की दिनांक १४.०९.२०२४ रोजी रात्री १०.१५ ते १०.४५ वाजताच्या दरम्यान आरोपीचे घरासमोर सार्वजनिक रस्त्यावर इतवारा बाजार वर्धा, तालुका व जिल्हा वर्धा येथे आरोपी हा लोखंडी तलवार हे शस्त्र विना परवाना बाळतांना मिळून आला व त्याद्वारे त्याने भारतीय हत्यार कायद्याचे कलम ४ सह २५ नुसार गुन्हा केला? | नाही. |
| २ | आदेश काय? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ करीता :**

७. अभिलेखावर सादर मौखिक पुरावा वाचला असता पंच (स.सा.१) (नि.क्र.७) याने साक्षीत असे सांगितले की दिनांक १४.०९.२०२३ रोजी पोलिसांनी त्याला पंच म्हणून

बोलाविले नव्हते व त्याचे समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याने फक्त पंचनाम्यावरील सही कबूल केली आहे परंतु त्यातील मजकूर पुर्णतः नाकारला आहे. सरकारी वकीलांनी विचारलेल्या उत्तरसूचक प्रश्नांमध्ये दिनांक १४.०९.२०२४ रोजी पोलिसांनी त्याला ईतवारा बाजार, वर्धा येथे घटनास्थळ पंचनाम्याचा पंच म्हणून बोलाविले नव्हते, घटनास्थळी गेल्यावर त्यांना दिसले की आरोपी हातात एक लोखंडी तलवार घेवून परिसरात दहशत पसरवित आहे, पोलिसांनी त्याचे नाव गाव विचारले असता आरोपीने त्याचे नाव मुकेश पांडे असे सांगितले व त्याचे ताब्यातून एक लोखंडी तलवार जप्त केली या सर्व परिस्थितीचा पंचनामा त्याचे समक्ष करण्यात आला व पंचनाम्यातील मजकूर खरा असल्याने त्याने त्यावर सही केली या सर्व बाबी साक्षीदाराने नाकारल्या आहेत. त्यामुळे सरकार पक्षाने तपासलेला एकमेव पंच साक्षीदार याने अभियोग पक्षास समर्थन केले नाही. प्रस्तूत प्रकरणात घटनास्थळ/जप्ती पंच हाच फितूर झाल्याने सरकार पक्षाला इतर साक्षीदार तपासण्याची आवश्यकता वाटली नाही. घटनेच्या वेळी इतरही व्यक्ती हजर असल्याचे फिर्यादीवरुन दिसून येते परंतु दोषारोप पत्रामध्ये त्यांची नावे दिसून येत नाही. पंचांव्यतिरिक् इतर साक्षीदार हे स्वतः पोलीसच आहेत. अशा परिस्थितीत त्यांची साक्ष नोंदविणे सरकार पक्षास आवश्यक वाटलेली नाही. त्याहीपलीकडे अभियोग पक्षातर्फे प्रकरणात आरोपीकडे सदर शस्त्र वापरण्याचा परवाना होता किंवा कसे यासंदर्भात मा.जिल्हा दंडाधिकारी यांचेकडील परिपत्रक दाखल करण्यात आले नाही. त्यामुळे आरोपी हा दिनांक १४.०९.२०२४ रोजी ईतवारा बाजार, वर्धा, तालुका व जिल्हा वर्धा येथे लोखंडी तलवार हे शस्त्र विना परवाना बाळतांना मिळून आला ही बाब सिध्द होत नाही. करीता प्रश्न क्र.१ ला मी नकारार्थी निष्कर्ष देत आहे.

**प्रश्न क्र.२ करीता :**

८. प्रश्न क्र.१ च्या निष्कर्षानंतर असे लक्षात येते की आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द झाला नसून तो निर्दोष सुटकेस पात्र आहे. जप्त मुद्देमाल लोखंडी तलवार हे हत्यार असून त्याची विल्हेवाट करण्याकरीता मा. जिल्हा न्यायदंडाधिकारी वर्धा यांचेकडे पाठविणे योग्य ठरेल. करीता प्रश्न क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१ आरोपी मुकेश मुन्ना पांडे याला भारतीय हत्यार कायद्याचे कलम ४ दंडनिय सह कलम २५ अन्वयेच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ आरोपीचे जामीनबंध मुक्त करण्यात येतात. आरोपीस आदेशीत करण्यात येते कि त्याने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ च्या तरतुदीची पुर्तता करावी.

३ जप्त मुददेमाल लोखंडी तलवार हे हत्यार असल्याने अपिल कालावधीनंतर मा. जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांच्याकडे विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावी.

४ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ नुसार न्यायनिर्णयाची प्रत मा.जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावी.

MRUNAL YASHWANT DOIPHODE

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.03.11 17:44:01 +0530

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

दिनांक ११.०३.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of steno | : | S.V. Made Gr.II |
| Court Name | : | Ct. of Chief Judicial Magistrate, Wardha |
| Judgment Date | : | 11.03.2026 |
| Dictated on | : | 11.03.2026 |
| Typed on | : | 11.03.2026 |
| Checked & Signed by Presiding officer on | : | 11.03.2026 |
| Uploaded on | : | 11.03.2026 |